आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत **२२०२- सर्वसाधारण शिक्षण** या उपशिर्षाखाली सन २०१८-१९ करीता **लेखाशिर्ष २२०२ १९०१ , २२०२ १९४८ व २२०२ एच ९७३ (राज्य स्तरीय योजना)** खाली निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८ / प्र.क्र.०४ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०९/०४/२०१८.

**वाचा -**

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८.

२) शालेय शिक्षण विभाग, नस्ती क्रमांक- अनुवि-४९१८/ प्र.क्र. ४५/ अर्थसंकल्प.

**प्रस्तावना-**

वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि. ०२/०४/२०१८ रोजीच्या शासन परीपत्रकाद्वारे सन २०१७-१९ च्या प्रथम नऊमाही करीता (डिसेंबर २०१८ अखेर) एकुण वार्षिक तरतूदीच्या ७० टक्के मर्यादेत अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरून आदिवासी उपयोजनांतर्गत मागणी क्र.टी-५, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०२- माध्यमिक शिक्षण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०१) ०२) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान ( २२०२ १९०१ ), (०१) (०४) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदान ( २२०२ १९४८ ) आणि ( ०१) (०७) सैनिकी शाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुकडीला सहाय्य ( २२०२ एच ९७३ ) ३६- सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षाकरीता अर्थसंकल्पिय तरतूदीपैकी ७० टक्के निधी योजना अंमलबजावणी विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना वितरीत करण्याची बाब शासन विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान ( लेखाशिर्ष २२०२ १९०१ ), अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदान (लेखाशिर्ष २२०२ १९४८ ) आणि सैनिकी शाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुकडीला सहाय्य (लेखाशिर्ष २२०२ एच ९७३ ) ३६- सहायक अनुदाने (वेतन) या योजना शालेय शिक्षण विभागामार्फत राबविल्या जात असल्याने त्यांअंतर्गत वेतन याबाबीकरीता विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना सन २०१८-१९ करीता पहिल्या नऊमाहीचा खर्च भागविण्यासाठी खालीलप्रमाणे अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ७० टक्के मर्यादेत निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

रु. लाखात

| अ.क्र. | योजनेचे नाव | अर्थसंकल्पित तरतूद | सदर निर्णयाद्वारे वितरीत करण्यात येत असलेली तरतूद |
|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान. (२२०२ १९०१ ) - ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) | ५३६०.९१ | ३७५२.६४ |
| २ | अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक | २४४.५० | १७१.१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | अनुदान ( २२०२ १९४८ ) - ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) | | |
| ३ | सैनिक शाळेमधील आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुकडीला सहाय्य ( २२०२ एच ९७३ ) - ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) | १४४८.०९ | १०१३.६६ |
| | **एकुण** | **७०५३.५** | **४९३७.४५** |

२. उपरोक्त आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत. तरी विभाग प्रमुख/ नियंत्रक अधिकारी यांनी सदर शासन परीपत्रकातील अटी व शर्थींचे पालन करून निध खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

३. सदर निधी अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यात आला आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११६५३२२०६२४असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.04.09 16:52:26 +05'30'

**रविंद्र औटे**
अवर सचिव.

**प्रत,**

१. मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/ नागपूर/ अमरावती.
८. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
९. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. वित्त विभाग ( अर्थ-१९ ) / ( व्यय-१४ ) मंत्रालय, मुंबई-३२
१३. कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, कार्यासन-११
१४. निवडनस्ती, कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग.